महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११८ वा | दिनांक : ०२/०२/२०२५ | वार : रविवार

# केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय?



**मुंबई** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज देशाचा अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पात प्राप्तिकरदात्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आजच्या अर्थसंकल्पात शेती, आरोग्य, रोजगार, लघु आणि मध्यम उद्योग, निर्यात, गुंतवणूक, ऊर्जा, नागरीकरण, खाणकाम, अर्थ, कर या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले आहे. एनडीएकडून या अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यात आले असले, तरी विरोधक मात्र या अर्थसंकल्पावर टीका करत आहेत. अर्थसंकल्पात मुंबई, पुणे मेट्रोसह ग्रामीण जोडसुधार प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. तर मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी २२९.९४ कोटी रुपये निधी देण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले? याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसा यांनी सोशल मीडिया एक्सवर माहिती दिली आहे. मुंबई मेट्रो : १२५५.०६ कोटी पुणे मेट्रो : ६९९.१३ कोटी एमयुटीपी ५११.४८ कोटी एमएमआरसाठी एकात्मिक आणि हरित प्रवासी सुविधा: ७९२.३५ कोटी मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे : ४००४.३१ कोटी सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : १०९४.५८ कोटी महाराष्ट्र ग्रामीण जोडसुधार प्रकल्प: ६८३.५१ कोटी महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क : ५९६.५७ कोटी नागनदी सुधार प्रकल्प : २९५.६४ कोटी मुळा-मुठा नदी संवर्धन : २२९.९४ कोटी ऊर्जा कार्यक्षम उपसा सिंचन प्रकल्प : १८६.४४ कोटी

दरम्यान, ही केवळ प्राथमिक माहिती. विविध मंत्रालयांची तरतूद तसेच रेल्वेची आकडेवारी सविस्तरपणे येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नमूद केले आहे.

दुसरीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करत महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात काय मिळाले? याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या दोघांच्याही आकडेवारीत प्रचंड तफावत दिसून येत आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला एमयुटीपी-३ प्रकल्पासाठी १४६५ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. पुणे मेट्रोसाठी ८३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुळा मुठा नदी संवर्धनासाठी जायकांतर्गत २३० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेच्या चार प्रकल्पांसाठी ४ हजार ३ कोटी, मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे - प्रशिक्षण संस्थेसाठी १२६ कोटी ६० लाख, मुंबई मेट्रोसाठी १६७३ कोटी ४१ लाख, महाराष्ट्र ग्रामीण दळणवळण सुधारणांसाठी ६८३ कोटी ५१ लाख, महाराष्ट्र अ‍ॅग्री बिझनेस नेटवर्क-मॅग्नेट प्रकल्पासाठी ५९६ कोटी ५७ लाख, ऊर्जा संवर्धन व लिफ्ट इरिगेशन प्रकल्पासाठी १८६ कोटी ४४ लाख, इंटीग्रेटेड ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रकल्प मुंबईसाठी ६५२ कोटी ५२ लाख, सर्वसमावेशक विकासासाठी आर्थिक क्लस्टर जोडणी कामांसाठी १०९४ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी महाराष्ट्राला मिळाला, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली.

देशातील शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, युवक, विद्यार्थी, सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सादर झालेल्या अर्थसंकल्पातून देशातल्या प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी, प्रत्येक समाजघटकाला बळ मिळणार आहे. देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला बळ मिळणार आहे. देशात तयार होणारे कपडे, चामड्याच्या वस्तू, मत्स्योत्पदनांवरील शुल्क कमी झाल्यानं महाराष्ट्राला त्याचा फायदा होईल, असा विश्वास असल्याचे अजित पवार म्हणाले.

शेतकरी, महिला, युवक, गरीब वर्गासाठी विविध योजनांची घोषणा केली आहे. महिलांच्या कौशल्यविकास प्राथम्याचा विषय आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेंतर्गत शेती उत्पादकता वाढ, शेतमाल साठवणूक सुविधा, सिंचन आणि क्रेडीट सुविधांवर भर देण्यात येणार असून शंभर जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल. कापूस आणि डाळींच्या उत्पादन वाढीसंदर्भात घेतलेले निर्णयही महाराष्ट्राच्या फायद्याचे आहेत. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. देशाला जगाचे फूड बास्केट बनवण्यात महाराष्ट्राची भूमिका प्रमुख असेल, असेही अजित पवारांनी म्हटले.

महाराष्ट्र हे शिक्षण, उच्च आणि तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. सरकारी शाळांमध्ये ५ लाख अटल टिंकरिंग लॅब स्थापन करणे, शाळा आणि आरोग्य केंद्रांना ब्रॉडबँड सेवा पुरवणे, भारतीय भाषांमध्ये पुस्तकं उपलब्ध करुन देणे, आयआयटीमधील तसेच मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थी संख्या आणि सुविधा वाढवण्याचा फायदा राज्यातील युवकांना निश्चितपणे होईल. ऑनलाईन गिग वर्कर्ससाठी ओळखपत्र तयार करून त्यांना ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचा निर्णय महत्वाचा असून सुमारे १ कोटी गिगवर्कर्सना पीएम जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य सेवा पुरवण्यात येणार आहे. हे सर्व निर्णय विद्यार्थी, युवक, समाजातील सामान्य घटकांना केंद्रस्थानी ठेवून घेण्यात आले असल्याचे अजित पवार म्हणाले.

न्यूक्लिअर एनर्जी मिशनच्या माध्यमातून २०४७ पर्यंत १०० गिगावॅट ऊर्जानिर्मितीचं लक्ष्य देशाला महासत्तेकडे नेणारे महत्वाचे पाऊल आहे. शहरांमध्ये सुधारणा राबवण्यासाठी सरकार १ लाख कोटींचा अर्बन चॅलेंज फंड निर्माण करण्याचा निर्णयही तितकचा महत्वाचा आहे. देशात १२० ठिकाणी उडान योजना राबवण्याचा त्यातून हवाई प्रवासी संख्या ४ कोटींवर नेण्याचा संकल्प आहे. देशातील ५२ प्रमुख पर्यटन स्थळांच्या विकासाचेही धोरण आहे. ही विकसित राष्ट्रासाठीची, महासत्तेच्या वाटेवरील आधुनिक भारताच्या निर्मितीसाठीची मजबूत पायाभरणी आहे. देशाला विकसित भारत, आर्थिक महासत्ता बनवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या प्रयत्नांना महाराष्ट्र संपूर्ण सहकार्य करेल, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

## आयकर सवलतीची घोषणा, पण तितके कमवायचे कसे? : आदित्य ठाकरे

**मुंबई** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर केला. आता नोकरदार लोकांनी नवीन कर व्यवस्था निवडल्यास १२.७५ लाखांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागणार नाही. यामुळे नोकरदारवर्गासाठी दिलासा मानला जात आहे. आमदार आदित्य ठाकरे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावरून सरकारवर जोरदार टीका केली आहे. आयकर सवलतीची घोषणा तर केली, पण कमवायचे कसे? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला आहे. तसेच देशातील वाढती बेरोजगारी रोखण्यावर अर्थसंकल्पात कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याची टीकाही त्यांनी केली.

आजच्या अर्थसंकल्पात शेती, आरोग्य, रोजगार, लघु आणि मध्यम उद्योग, निर्यात, गुंतवणूक, ऊर्जा, नागरीकरण, खाणकाम, अर्थ, कर या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले आहे. एनडीएकडून या अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यात आले असले, तरी विरोधक मात्र या अर्थसंकल्पावर टीका करत आहेत. ठाकरे गटाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनीही सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत केंद्रीय अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली आहे.

२०१२-१४ च्या सुमारास निवडणुकीपूर्वी आयकर रद्द करण्याची घोषणा करणारा भाजप आता अधिक उदार झाल्याचे दिसत आहे. आता ते करांची श्रेणी आणि रिबेटर करदात्यांशी वाटाघाटी करत असल्यासारखी करसवलत जाहीर करत आहेत. बऱ्याच अटी आणि अनेक छुप्या करांसह ही करसवलत देण्यात येत आहे, असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला.

देशात जनतेने आपली ताकद दाखवली आहे. भाजपला जनतेने २४० जागांवर रोखले आहे. याआधी बहुमत असलेल्या सरकार जनतेला गृहीत धरत होते. आता सरकार आयकर सवलती आणि अतर सवलतींबाबत घोषणा करत आहे. मात्र, त्यांनी जाहीर केलेल्या श्रेणींपर्यंत पैसे कसे कमवायचे, याचे काही मार्ग त्यांनी ठेवले आहेत काय? असा सवाल करत देशात सर्वाधिक बेरोजगारी असताना ती रोखण्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ फेब्रुवारी २०२५


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात केंद्रीय अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण आणि चर्चा



**मुरुम,ता.उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील वाणिज्य विभागामार्फत 2025 चा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२५ चा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला.

या अर्थसंकल्पाचे लाईव्ह थेट प्रक्षेपण वाणिज्य विभागामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. या अर्थसंकल्पामधील सर्वसामान्य जनता, शेती, उद्योग,व्यापारी, नोकरदार आणि गुंतवणूक आदि क्षेत्रात अर्थसंकल्पातील बदलाच्या तरतुदींची सविस्तर माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना दिली.

अर्थसंकल्पातील तरतुदी शेतकरी, उद्योजक, व्यापारी, सर्वसामान्य यांना फायदेशीर ठरणारा आहे की नाही याची अभ्यासपूर्ण माहिती संकलित करावी. येत्या दोन दिवसात या संपुर्ण अर्थसंकल्पाचे विश्लेषण करावे. आणि वाणिज्य मंडळाच्या वतीने चालू असलेल्या कॉमर्स बुलेटीन मध्ये प्रकाशित करावे.

त्यानंतर गट चर्चा घ्यावी, असे आवाहन प्राचार्य अस्वले यानी केले. या कार्यक्रमाला डॉ. अजित आष्टे, प्रा. खंडू मुरळीकर, प्रा. अक्षता बिराजदार ,प्रा. अंजली चव्हाण प्रा. संध्याराणी चौगुले व वाणिज्य विभागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ९१ व ९१ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळांचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "मूकनायक" या पाक्षिकाची सुरुवात केली होती. त्या मूकनायकच्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या वतीने दोन वेगवेगळ्या ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

९१ वी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा : तारीख : २ फेब्रुवारी २०२५ वेळ : दुपारी ९:३० वाजतास्थळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, सवंदगांव, ता. वैजापूर, जिल्हा : छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. विषय : मी लोकशाहीचा पाठीराखा असून कोणत्याही आकारात आणि पद्धतीत असलेल्या एकाधिकारशाहिचा विध्वंसक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्धाटक : मा. ताराचंद बागूल (सामाजिक कार्यकर्ते) प्रमुख वक्ते : मा. गोरख शिवाजी कदम (सामाजिक कार्यकर्ते) अध्यक्षता : मा. बी. बी. मेश्राम (संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती छत्रपती संभाजी नगर)

९२ वी कार्यशाळा : स्थळ : जनसंपर्क कार्यालय: फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. दिनांक : २ फेब्रुवारी २०२५वेळ : सायंकाळी २ :३० वाजता, विषय : दैवावर भरोसा ठेवून वागू नका, जे करावयाचे आहे ते मनगटाच्या जोरावर करा. याच जन्मी सर्वांगीण उन्नती करायला हवी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरउदघाटक : मा. सुभाष ठोकळ (सामाजिक कार्यकर्ते) प्रमुख वक्ते : मा. प्रतीक पंचशील (सामाजिक कार्यकर्ते, छत्रपती संभाजी नगर) अध्यक्षता : मा. बी. बी. मेश्राम (संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल छत्रपती संभाजी नगर) सर्व नोंदणीकृत उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता ९१ व ९२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## कन्या प्रशालेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



मुरूम, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

मुरूम, ता. उमरगा, **(प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवारी (ता.1) रोजी उत्साहात पार पडला. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करून दीपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मंकावती कांबळे होत्या. याप्रसंगी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका अलका गायकवाड, शालेय शिक्षण समितीचे उमेश बिराजदार, माध्यमिकचे गुंडू पुराणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थिनींनी विविध प्रकारच्या कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. प्राथमिकच्या चिमुकल्यांच्या डान्सवरती श्रोत्यांनी ठेका धरून कौतुक केले.

यावेळी महाराष्ट्रातील विविध लोककलासह कन्नड, तेलगू व बंजारा गीतांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्यांचे सादरीकरण केले. मुख्याध्यापिका मंकावती कांबळे म्हणाल्या की, शालेय उपक्रमांमधील सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वाचा असतो. हरी शेके, बालाजी गायकवाड, डॉ. वंदना जाधव, रेणुका कुलकर्णी, बीना पोतदार, सोनाली कलशेट्टी, रोहिणी चव्हाण, सविता साळुंखे, उमाकांत महामुनी, सचिन राठोड, बालाजी कुनाळे, अशोक गायकवाड, ललिता पवार, तात्या जाधव आदींनी पुढाकार घेतला.

पालक आणि शिक्षक यांनी विद्यार्थिनींच्या कलागुणांचे कौतुक करून उत्कृष्ट नृत्य करणाऱ्या कलाकारांना बक्षीसे देण्यात आली. कार्यक्रमाचा विद्यार्थी व पालकांनी आनंद लुटला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ फेब्रुवारी २०२५


# जेईएस महाविद्यालयात विद्यार्थी संसदेचे उद्घाटन

## महाविद्यालयीन निवडणुकांमधून युवकांना लोकशाही प्रणाली समजते : प्राचार्य डॉ.अग्निहोत्री



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या निवडणुका झाल्या पाहिजेत ,यामधून लोकशाही शासन प्रणाली युवकांना समजते, मतदार हा लोकशाहीचा राजा असतो, असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे विद्यार्थी संसदेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालना येथे विद्यार्थी संसदेच्या अध्यक्ष सचिव व विद्यार्थी प्रतिनिधींना शपथ देण्यात आली असून यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते ,प्रमुख पाहुणे श्री यश बगडीया व श्री धनीवाला होते.

व्यासपीठावर युवा जल्लोष चे प्रमुख डॉ. गणेश कुलकर्णी व सांस्कृतिक व क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.हेमंत वर्मा तसेच विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री, सचिव राहुल चोरमारे, विद्यार्थीनीं प्रतिनिधी कु.तेजस्विनी राऊत आर्दीची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की महाविद्यालयाची शिस्त व नियमाचे काटेकोर पालन केले जाईल, विद्यार्थ्यांच्या समस्यासाठी मी सदैव तत्पर राहील, माझ्या काळात महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवीन, असे तन्मय अग्निहोत्रींनी सांगितले, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. तेजस्विनी राऊत हिने ही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री यश बगडीया म्हणाले की,विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये शिस्तीचे पालन करून ,सोबत अध्ययन करावे. विद्यार्थी प्रतिनिधीनी आपला आदर्श इतर विद्यार्थ्यांसमोर ठेवावा,असे वर्तन करावे असेही श्री बगडीया यांनी सांगितले.

अध्यक्ष भाषण करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, महाविद्यालयीन निवडणुका झाल्याच पाहिजेत, यामुळे युवकांना लोकशाही समजते.

लोकशाही मधील मतदार हा राजा असतो. या निवडणुकीमधूनच पुढे आमदार, खासदार, मंत्री होण्याची युवकांना संधी मिळते. आज जेईएस महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार, खासदार मंत्री झाल्याचेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी नवनियुक्त सर्व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते, विद्यार्थी- विद्यार्थिनी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.बाबासाहेब वाघ यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. दीपवाल मॅडम यांनी मानलेत.

# बाळासाहेब पवार वाचनालयात केंद्रीय अर्थसंकल्पावर रंगल्या बजेट गप्पा



**कन्नड (अरुण थोरात):** देशाचा अर्थसंकल्प संसदेत मांडण्यात आला. अर्थसंकल्प देशातील प्रत्येक क्षेत्रावर परिणाम करत असतो.

केंद्रीय अर्थसंकल्प अर्थात बजेट- २०२५ यावर चर्चा व्हावी आणि यातील बारकावे समजावे या अनुषंगाने सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्या वतीने दि.०१ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बजेट - २०२५ चे थेट प्रक्षेपण आणि बजेट गप्पांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कन्नड शहरातील प्रतिष्ठित उद्योजक, व्यापारी, प्रगतशील शेतकरी, नोकरदार आणि विद्यार्थ्यांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. या चर्चेत कन्नड शहरातील प्रसिद्ध व्यापारी संदीप वर्मा यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील अस्थिर स्थितीमुळे सोन्यामधील गुंतवणुकीत लोकांचा कल वाढत आहे. त्यामुळे त्यावरील आयात शुल्क आणि वस्तू आणि सेवा कर कमी करण्यासंदर्भात मत व्यक्त केले.

प्रभाकर महाले यांनी अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजनेची मर्यादा वाढवली याबद्दल समाधान व्यक्त केले. धनंजय देशमुख यांनी अंदाजपत्रक आणि शासनाच्या लघु उद्योगाच्या संदर्भातील असलेल्या तरतुदीवरती भाष्य केले. असिफ शेख यांनी व्यापाऱ्यांसाठी करंट अकाउंट वरील टीडीएस मर्यादा वाढवण्यासंदर्भात चर्चा केली.

श्री. कुंभकर्ण यांनी पेन्शनर व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी भरीव तरतूद नसल्याबद्दल खंत व्यक्त केली. प्रा. प्रमोदराव बोरसे यांनी ग्रामीण भागातील शाळांना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी देण्याची तरतूद केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. याचबरोबर प्रा. साहेबराव नवले, डॉ. जगदीश भेलोंडे, डॉ. अतिश मेहत्रे, अरुण ब्राह्मणकर, कालिदास उपासनी, कृष्णा जाधव यांनी अर्थसंकल्पातील वेगवेगळ्या तरतुदींवरती मत व्यक्त केले.

यावेळी वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, डॉ. रवींद्र घोती, एस. आर. चौधरी, डॉ. मीना वडगुळे, रिद्धी पवार, आरती जाधव, शिफा शेख, धर्मू मधे, प्रदीप सोनवणे, प्रमोद सातपुते, प्रवीण कातवारे, ऋषिकेश जंजाळ, गोपाळ सोनवणे, आर्दी सह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंगेश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुनिल गोरडे यांनी केले, तर आभार ऋषिकेश शिवदे यांनी व्यक्त केले.

# आशुतोष वैद्य यांचा सन्मान

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालूक्यातील येथे नाईचाकूर ग्रामपंचायतच्या वतीने आशुतोष वैद्य यांना बेस्ट ट्री प्लांटेशन अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

समाज विकास संस्थेच्या वतीने नाईचाकूर ,तालुका उमरगा जिल्हा, धाराशिव येथे ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रात दहा हजार झाडे लावून दिली.त्यांचे हे परिश्रम आणि मानव जातीसाठी केलेल्या या उत्कृष्ट कार्याला चेल्लाराम फाऊंडेशनचे समन्वयक आशुतोष वैद्य यांनी मोलाची मदत केली.म्हणून ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांना आज ३१.१.२०२५ रोजी डिस्ट्रिक्ट लेवल बेस्ट ट्री प्लांटेशन अवार्ड देऊन माननीय तहसीलदार..... येरमे साहेब यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन गावचे सरपंच चंद्रकांत स्वामी,उपसरपंच भीम पवार,माजी उपसरपंच बी के पवार,मराठा सेवा संघाचे उपाध्यक्ष,समाजसेवक सतीश पवार,समाजसेवक वेंकट लादे, बप्पा पवार,गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत चे सर्व सदस्य यांनी आयोजन केलं होतं.या कार्यक्रमाला महाराष्ट्र लोक विकास मंच (उत्तरदायित्व) चे बालाजी शिंदे,भास्कर मुंडे,मनीषा घुले हे विशेष प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.

हा पुरस्कार माननीय तहसीलदार येरमे साहेब यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी अनाथाची माय विद्याताई वाघ यांच्या कार्याचा गौरव करून त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाज विकास संस्थेचे कार्यवाह भूमिपुत्र वाघ यांनी केले तर बप्पा पवार यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्या मार्कड, भाग्यश्री मोरे आफ्रिन मुल्ला,मीनाक्षी करूनुरे, गोविंद कामले,सतीश पवार, वेंकट लादे, तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले... या कार्यक्रमाला नाइचाकूर भगतवाडी,कोळेवाडी, परिसरातील महिला पुरुष बहुसंख्येने सहभागी झाले होते.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०२ फेब्रुवारी २०२५

# प्राचार्य डॉ. शेख एजाज आणि डॉ. शैलेंद्र भणगे यांचा सेवा गौरवपूर्ती समारंभ उत्साहात साजरा

**खुल्ताबाद :** खुलताबाद येथील चिस्तिया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रमुख तसेच इतिहास संशोधन केंद्राचे संचालक डॉ. एजाज शेख आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र भणगे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या सेवा गौरवपूर्ती समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सय्यद असिफ झकेरिया हे होते. तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उर्दू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शेख मोहम्मद अय्युब, संस्थेचे उपाध्यक्ष मोहम्मद शाकेर आणि कोषाध्यक्ष डॉ. अब्दुल मुकीद, संस्थापक प्राचार्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य डॉ. गणी पटेल यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. शैलेंद्र भणगे आणि प्राचार्य डॉ. शेख एजाज यांच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. मेहरूनिस्सा, अब्दुल्ला चाऊस, अलमास बानो, समरीन शेख, शबाना शेख, मोहम्मद रियाज, सुभाष दाणे, डॉ. निशाद नायरा, जैदी सैफ, डॉ. मोहम्मद युनूस, डॉ. नाजनीन मॅडम, प्रा. मोरे, राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. सुनील जाधव, डॉ. कादरी मॅडम, पत्रकार नईम बक्ष, माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन, आबेद जहागीरदार यांनी डॉ. भंणगे आणि डॉ. एजाज शेख यांच्या संदर्भात आणि एकूणच महाविद्यालयाच्या सुरुवातीपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा आपल्या मनोगतात गौरवपूर्ण उल्लेख केला.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. मोहम्मद शाकेर आणि प्राचार्य असिफ झकेरिया यांनी या दोघांनी महाविद्यालयासाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यावेळी दोन्ही सत्कारमूर्तींनी आपल्या मनोगतामध्ये संस्थेने दिलेली संधी, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री स्वर्गीय अब्दुल अजीम साहेब तसेच अब्दुल अजीज साहेब, अब्दुल वहीद साहेब आणि विद्यमान पदाधिकारी शेख मोहम्मद अय्युब, मोहम्मद शाकेर, डॉ. अब्दुल मुकीद आणि महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ. गणी पटेल यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करून या ऐतिहासिक अशा शहरामध्ये काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

या महाविद्यालयामुळेच आमचे जीवन सुकर झाले आणि अनेक विद्यार्थी घडवण्यामध्ये आम्हाला सहभाग घेता आला, त्यांचे जीवनमान उंचावता आले हे आमचे भाग्य समजतो अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हरी जमाले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.














